संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिद्ध..

बांधिलकी जनहिताची

# नायक

सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने | कार्यकारी संपादक : श्याम तिवारी

Sangamner | MAHMAR/2018/75654 | वर्ष ८ | अंक ८२ | २/८/२०२५ (दैनिक) | किंमत रु.२/- | पाने ४

लग्न म्हणजे बस्ता
बस्ता म्हणजे राजेन्द्र
१९५९ पासून राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425 - 225740, मोबा : 7901031155

हरिचंद टेक्सटाईल्स मार्केट
एथनिक वेअर | बस्त्यासाठी खास सोय
नामांकित कंपन्यांचे सुटींग शर्टींग | होलसेल साडी डेपो
आम्ही जपतो तुमचा विश्वास..!
मार्केट यार्ड जवळ, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर ,7972842036

आला रे आला राजपाल सेल आला..!
स्मार्ट असो वा मार्ट.. मिल असो वा मॉल.. सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226 | अ. नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

कोथमिरे मसाले SINCE 1992
चवीला खरे कोथमिरे!
स्वाद, स्वास्थ्य, सर्वांगसुंदर मसाले सारे, चवीला खरे कोथमिरे मसाले !
सन १९९२ पासून ग्राहकांच्या पसंतीस उतरलेले मसाले
कोथमिरे मसाले
+91 9370584332
www.kothmiremasale.com

# ‘सुरत-चेन्नई’ महामार्ग जिल्ह्यासाठी ‘गेमचेंजर’!

## दक्षिणेसह उत्तरेचेही प्रवेशद्वार उघडणार

### संगमनेर तालुक्यातील तिनशे हेक्टर जमीनीचे संपादन

नायक वृत्तसेवा, संगमनेर

पायाभूत सुविधांच्या माध्यमातून देशाचा आर्थिक विकास साधण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतमाला ही महत्त्वकांक्षी योजना जाहीर केली होती. तब्बल सात लाख कोटी रुपये खर्चाच्या या योजनेत महाराष्ट्रालाही ११ महामार्ग मिळाले आहेत. त्यातील ‘सुरत ते चेन्नई’ या देशातील दुसऱ्या सर्वात जास्त लांबीच्या एक्सप्रेस महामार्गाला केंद्रीय अर्थ मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. पुढील पंधरा दिवसांत केंद्रीय मंत्रीमंडळाच्या अंतिम मंजुरीनंतर पहिल्या टप्प्यात नाशिकच्या आंबेगाव ते सोलापूर या ४१३ किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी भूसंपादन आणि आडगाव ते सोलापूरपर्यंतच्या ३८३ किलोमीटर अंतराच्या रस्त्याचे बांधकाम सुरु होणार आहे. जिल्ह्यातील चार तालुक्यांमधून शंभर किलोमीटर जाणाऱ्या या महामार्गाच्या कामात संगमनेर तालुक्यातील १८ गावांमधील २८२ हेक्टर जमीनीचे संपादन होणार आहे. या ग्रीनफिल्ड प्रकल्पामुळे दक्षिण भारतासह उत्तर भारताचेही प्रवेशद्वार उघडणार असल्याने हा महामार्ग अहिल्यानगर जिल्ह्याच्या विकासात ‘गेमचेंजर’ ठरण्याची शक्यता आहे.



देशाची चारही टोकं महामार्गाच्या माध्यमातून एकमेकांना जोडून आर्थिक विकासाच्या चक्राला गती देण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२१ मध्ये ‘भारतमाला’ या अतिशय महत्त्वकांक्षी योजनेची घोषणा केली होती. केंद्रीय रस्ते विकास मंत्रालयाच्या माध्यमातून देशाच्या विविध भागात महामार्गांचे जाळे निर्माण करणे हा या योजनेमागील मूळ हेतू आहे. या योजनेतून देशात ४४ आर्थिक कॉरिडोर साकारले जात असून त्यात मुंबई-कोलकाता, मुंबई-आग्रा आणि सुरत-नागपूर या उत्तर महाराष्ट्रातील तीन कॉरिडोरचा समावेश आहे. त्याच श्रृंखलेत आता सुरत ते चेन्नई या १२७१ किलोमीटर अंतराच्या ग्रीन कॉरिडोरमधील नाशिक ते सोलापूर या पहिल्या टप्प्यातील ३८३ किलोमीटरच्या कामाला केंद्रीय अर्थ मंत्रालयाची मंजुरी

(पान ३ वर)

- सुरत ते चेन्नई या १२७१ किलोमीटर लांबीच्या या महत्त्वकांक्षी प्रकल्पातील चेन्नई ते अक्कलकोट (सोलापूर) पर्यंतच्या महामार्गाचे काम पूर्ण झाले असून केंद्रीय मंत्रीमंडळाच्या मंजुरीनंतर अक्कलकोट ते आडगाव या ३८३ किलोमीटरच्या रस्त्याचे बांधकाम सुरु होईल. आडगाव ते सुरत या अंतरात पर्यावरण विषयक मंजुऱ्या असल्याने २९०.७० किलोमीटर अंतराच्या रस्त्याचे हे काम शेवटच्या टप्प्यात होईल. या संपूर्ण महामार्गामुळे चेन्नई ते सुरत हे सध्याचे ३५ तासांचे अंतर अवघ्या १८ तासांवर येणार आहे.

संगमनेर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष आमचे मार्गदर्शक
मा.श्री.दिलीपराव पुंड
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
राजर्षी शाहू महाराज सामाजिक सेवाभावी संस्था
डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर, घुलेवाडी, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर
श्री.अनिल बंडू गायकवाड (अध्यक्ष) | श्री. मोकळ चंद्रधर कचरु (उपाध्यक्ष)
श्री.वाकचौरे संदिप केरू (सचिव)
सदस्य मंडळ
श्री. रहाणे कपिलेश्वर श्रीपत | श्री.साईनाथ साबळे | श्री. आल्हाट सर
श्री. बागुल के.सी. | ॲड. रुची सुरुसे | सौ. प्राची यादव
सौ. सुरेखा ढोबळे | सौ. ललिता गायकवाड

NATURE EARTH
RESTAURANT & AGRO RESORT
Kolhewadi Phata, Behind Shetkari Agro Clinic, Vadgaon Pan, Sangamner, Dist. A. Nagar
natureagroresort@gmail.com / www.natureagroresort.com | 88 477 88 099 / 89 75 40 82 85
CONFERENCE HOLL | RESTAURANT | ROOMS | CONFERENCE PAD

सेल सेल सेल
सुरु झालाय भव्य जागेत भव्य सेल
सेल SUPER SALE सेल
20 ते 50% पर्यंत डिस्काउंट
टी-शर्ट । जीन्स ₹100/- | टॉप । लेगिंग ₹100/- | चुडीदार । वनपीस ₹300/- | फ्रॉक । वेस्टर्न ₹300/-
सारीका चिल्ड्रन अँण्ड लेडीज वेअर
बाजारपेठ, प्रतिभा फोटो शेजारी, संगमनेर 98223 58335

आपुलकीने वाढे विश्वासाने वाढे
ओम मयूर ज्वेलर्स
आमचे ध्येय
सर्व मानवी सुखद जीवनात सुवर्ण आनंद आणि उत्सव प्रदान करणे.
सर्व मानवाच्या संपत्तीत सोने व चांदीच्या स्वरुपात वाढ करणे.
अधिक माहिती साठी संपर्क
अशोक चौक, संगमनेर, जि. अ.नगर 422 605 फोन : 02425 225924 | मो.: 93720 12044

चैतन्य हॉस्पिटल (डॉ.जठार)
ताजणे मळा, डॉ.नागरे हॉस्पिटल समोर नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (02425)-221632 / 224761 / 7038170382
सर्व इन्शुरन्स कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध
(फक्त कॅशलेससाठी संपर्क नंबर - 7038170332)
डॉ.सौ. उज्ज्वला जठार
एम.बी.बी.एस., डी.सी.एच., कन्सल्टंट पेडिॲट्रिशियन
तज्ञ - बालरोग, नवजात अर्भक, प्रिमॅच्युअर बेबी केअर
डॉ.नितीन जठार
एन.बी.बी.एस. डी.टी.सी.डी., कन्सल्टंट फिजिशियन
तज्ञ - छातीचे, हृदयरोग, टी.बी. व दम्याचे विकार
उपलब्ध निदान सुविधा
अत्याधुनिक अतिदक्षता विभाग | जनरल सर्जरी
आपत्कालिन औषधे व उपचार | मधुमेह व हृदयरोग
दमा व श्वसनाचे | फुफ्फुससंबंधी औषधोपचार
बालरोग चिकित्सा विभाग | सर्पदंश व विषबाधा
पोटाचे विकार औषधे व शस्त्रक्रिया | किडनी विकार
संधीवात व मनके विकार | मेंदू विकार व शस्त्रक्रिया
सी.टी. स्कॅन
डायलिसीस
डिजीटल एक्स-रे
सोनोग्राफी
2-डि इको
स्पायरोमेट्री
पॅथोलॉजी (लॅब)

काजळे ज्वेलर्स
मार्केट मधील सर्वात कमी भाव
सोने विमा संरक्षण उपलब्ध
सुवर्ण बचत भिशी उपलब्ध
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर 9601222777, 9615222777

भरपूर ऑफरसह नाविन्याने नटलेला...
कुर्तीज फेस्टीवल
मुंबई, अहमदाबाद, जयपुर, दिल्ली, कलकत्ता, लखनऊ, बॅंगलोर येथील उत्कृष्ट डिझाईनर्सने बनविलेल्या कुर्तींवर मिळवा
20 TO 50% OFF
भंडारी
मेनरोड कॉर्नर, संगमनेर 02425 225719

# संपादकीय

सुविचार : दीर्घ आणि सुखी आयुष्याचे एकमेव रहस्य म्हणजे रात्री झोपण्यापूर्वी सर्वांना सातत्याने त्यांच्या चुकांबद्दल माफ करणे होय. – बनार्ड बरूच

## टेरीफ धमाका

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर २५ टक्के आयात कर आणि अतिरिक्त कर लादण्याची घोषणा केली आहे. भारत रशियाकडून शस्त्रास्त्रे आणि तेल खरेदी करत आहे, त्यामुळे हा कर लादला जात आहे असे ते म्हणाले. 'मित्र' भारताला अमेरिकेने दिलेला हा मोठा झटका मानला जात आहे. 'ट्रुथ सोशल' या मीडियावर पोस्ट करत ट्रम्प यांनी म्हटले आहे की, भारत हा आपला मित्र आहे, परंतु अनेक वर्षे आपण भारताबरोबर फारसा व्यापार करू शकलो नाही. कारण त्यांचे आयात शुल्क खूपच जास्त आहे. जगातील कुठल्याही देशात नसतील असे अत्यंत कठीण व त्रासदायक व्यापार अडथळे भारतात आहेत. भारत आतापर्यंत नेहमीच रशियाकडून मोठ्या प्रमाणावर लष्करी उपकरणे खरेदी करत आला आहे आणि चीनसह तो रशियाचा सर्वांत मोठा ऊर्जा खरेदीदार आहे. संपूर्ण जगाला रशियाचा युक्रेनमधील नरसंहार थांबावा असे वाटत असताना भारताने असा व्यवहार करणे योग्य नाही. म्हणून १ ऑगस्टपासून भारतातून येणा-या वस्तूंवर २५ टक्के कर लावण्यात येत आहे तसेच याच कारणासाठी भारतावर दंड देखील आकारला जाईल. गत काही महिन्यांपासून भारत आणि अमेरिका यांच्यात व्यापार करारावर चर्चा सुरू आहे. जुलैअखेरपर्यंत हा करार होणार असल्याचे सांगितले जात होते. परंतु अद्याप कोणतीही ठोस सहमती झाली नाही. अमेरिकेने करार करण्यासाठी भारताला १ ऑगस्टपर्यंत मुदत दिली होती. तत्पूर्वी करार न झाल्यास अमेरिका भारतावर आयात शुल्क लागू करू शकते, असे संकेत ट्रम्प यांनी दोन दिवसांपूर्वीच दिले होते. अमेरिकन कंपन्यांना भारतीय बाजारपेठेत प्रवेश द्यायचा नाही असे भारताचे धोरण आहे. त्यामुळे १ ऑगस्ट हा अमेरिकेसाठी महान दिवस ठरेल असे ट्रम्प म्हणाले होते. ट्रम्प यांनी यापूर्वी २ एप्रिल २०२५ रोजी भारतीय वस्तूंवर २६ टक्के आयात कर लावला होता आणि नंतर तो तात्पुरता मागेही घेतला होता. मात्र, आता पुन्हा एकदा अधिक कठोर भूमिका घेत २५ टक्के टॅरिफ आणि अतिरिक्त दंड लागू करण्याची घोषणा करण्यात आली आहे. या निर्णयामुळे भारताच्या अमेरिकेतील निर्यातीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. विशेषत: कपडे, औषधे, मोटारींचे सुटे भाग, स्टील आणि कृषी उत्पादने या क्षेत्राला याचा फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारताला आता नव्याने अमेरिकेशी चर्चेची दिशा ठरवावी लागणार आहे. ट्रम्प यांच्या घोषणेनंतर परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांची बैठक झाली. या बैठकीचा तपशील बाहेर आला नाही. द्विपक्षीय व्यापार कराराच्या सहाव्या फेरीच्या चर्चेसाठी अमेरिकन अधिकारी २५ ऑगस्ट रोजी भारतात येणार आहेत. सप्टेंबर–ऑक्टोबरपर्यंत कराराचा पहिला टप्पा पूर्ण होईल, असा अंदाज आहे. व्यापार कराराबाबतच्या चर्चेचा पाचवा टप्पा वॉशिंग्टनमध्ये पार पडला होता. भारत–पकिस्तानमधील युद्धविरामाबाबत आपणच मध्यस्थी केली होती असा पुनरुच्चार डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. त्यावरून लोकसभेत काँग्रेस नेते आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला. ट्रम्प सर्व सत्य बाहेर काढतील या भीतीने मोदींनी लोकसभेत ट्रम्प यांचे नाव घेतले नाही, अशी बोचरी टीका केली होती. ट्रम्प जर खोटे बोलत असतील तर पंतप्रधान मोदींनी ट्रम्प यांचे नाव घेऊन ते खोटे बोलत आहेत असे ठणकावून सांगावे असे आव्हान राहुल गांधी यांनी दिले होते. मात्र, त्यानंतर मोदींनी केलेल्या भाषणात ट्रम्प यांच्या नावाचा उल्लेख केला नव्हता. ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर २५ टक्के आयात शुल्क लावण्याची घोषणा केल्यानंतर काही तासांतच भारताने त्याला प्रत्युत्तर दिले आहे. अमेरिकेसोबत व्यापार वाटाघाटी सुरू ठेवत असतानाच भारत आपले शेतकरी, उद्योजक आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे हित जपण्यासाठी ठोस पावले उचलेल, असे भारताने स्पष्ट केले आहे. भारत आणि अमेरिका गत काही महिन्यांपासून एक न्याय्य, संतुलित आणि परस्पर फायदेशीर द्विपक्षीय करार पूर्ण करण्यासाठी वाटाघाटी करत आहेत. आम्ही त्या उद्दिष्टासाठी कटिबद्ध आहोत असे भारताने म्हटले आहे. परदेशी कंपन्यांसाठी आपली बाजारपेठ खुली करताना भारत देशांतर्गत कंपन्यांच्या हिताचे रक्षण करण्याबाबत संवेदनशील आहे, असे भारताने ब्रिटनसोबत नुकत्याच झालेल्या मुक्त व्यापार कराराचा दाखला देत सांगितले आहे. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळापासून आणि दुस–यांदा शपथ घेतल्यानंतरही त्यांनी भारताच्या शुल्क रचनेवर वारंवार टीका केली आहे. अमेरिकन उत्पादनांवर शुल्क आकारणी करताना भारताला 'खूप मोठा गैरवापर करणारा'देश असे त्यांनी म्हटले आहे. अनेक फे–यांच्या चर्चेनंतरही कृषी क्षेत्र हा दोन्ही बाजूंमधील सर्वांत मोठा वादाचा मुद्दा राहिला आहे. भारत आपले कृषी आणि दुग्ध उत्पादन क्षेत्र अमेरिकेसाठी खुले करण्यास इच्छुक नाही. दरम्यान नवीन जाहीर केलेल्या शुल्कांमुळे भारताच्या अनेक उच्च–कार्यक्षम निर्यात क्षेत्रांना लक्ष्य करण्यात आले आहे. यात ऑटोमोबाईल्स, ऑटो पार्ट्स, स्टील, ॲल्युमिनियम, स्मार्टफोन, सौर मॉड्यूल्स, सागरी उत्पादने, रत्ने, दागिने आणि निवडक प्रक्रिया केलेले अन्न आणि कृषी वस्तू या सर्वांचा २५ टक्के शुल्काच्या यादीत समावेश आहे. मात्र, फार्मास्युटिकल्स, सेमीकंडक्टर्स आणि खनिजे यांना यातून वगळण्यात आले आहे. अमेरिकेने भारतावर १ ऑगस्टपासून २५ टक्के आयातशुल्क लावल्याने अमेरिकेत निर्यात होणा–या भारतीय वस्तू तेथे महाग होणार आहेत. त्याचा विपरीत परिणाम भारताच्या व्यापारावर होणार आहे. 'दोस्त–दोस्त'ची माला जपत अमेरिकेने भारताला तडाखा दिला आहे. कोणत्याही जागतिक नेत्याच्या सांगण्यावरून भारत–पाक युद्ध थांबवले नाही, असे पंतप्रधान मोदींनी मंगळवारी लोकसभेत स्पष्ट केल्यानंतर दुस–याच दिवशी अमेरिकेने भारतावर २५ टक्के टॅरिफ लादण्याचा निर्णय जाहीर केला. म्हणजेच दोन्ही देशांत सारे काही आलबेल नाही. अमेरिकेत तयार होणा–या उत्पादनांना सहजपणे भारतीय बाजारपेठेत प्रवेश मिळावा यासाठी ट्रम्प सातत्याने भारतावर दबाव निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहेत. शेवटी 'दोस्त–दोस्त ना रहा' हेच खरे!

## धाडसी व संवेदनशिल व्यक्तीमत्व : दिलीपशेठ पुंड

**जे का रंजले, गांजले,**
**त्यासी म्हणे जो अपुले,**
**तोची साधू ओळखावा**
**देव तेथेची जाणावा!**

वरील पंक्ती सार्थ ठरविणारे माजी नगराध्यक्ष तथा जयहिंद नागरी सहकारी पतसंस्थेचे विद्यमान चेअरमन दिलीपशेठ सहदेव पुंड एक आदर्शवत व कर्तृत्ववान व्यक्तीमत्व. स्वभाव म्हणाल तर कोकणातील फणसासारखा, वरुन टनक मात्र आतून मऊ. त्यांच्या वाढदिवसानिमीत्ताने त्यांच्याबद्दल लिहीत असतांना जाती, धर्म, पंथ या पलिकडे जावून त्यांनी केलेली सेवा विशेष उल्लेखनिय आहे व वाखाणण्यासारखी आहे. गणेशनगरमधून त्यांनी खऱ्या अर्थाने राजकारणाचा श्रीगणेशा केला. १९९१ साली त्यांनी संगमनेर नगमरपालिकेत पदार्पण केले. एक ड्रायव्हर माणूस म्हणून ओळख असलेले दिलीप पुंड भविष्यात सर्वांच्या गळ्यातील ताईत बनतील असे तेव्हा कदाचित कोणालाही वाटलेही नसेल. पण आपल्या कार्य कर्तृत्वाच्या जोरावर यशाचे एक एक शिखर पादाक्रांत करत मजल दरमजल करत केलेला प्रवास आणि सामान्य ते सर्वसामान्य माणसाला वेळोवेळी आपल्या कुवतीनुसार केलेली मदत आणि प्रश्न सोडविण्याची, समजून घेण्याची असलेली पध्दत ही दिलीपशेट पुंड यांची व्यक्तीमत्वाची बलस्थाने आहे. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी माणसाकडे चिकाटी, सचोटी, कसोटी, हातोटी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे क्वालीटी असावी लागते. या सर्व गोष्टी दिलीपशेट पुंड यांनी आत्मसात केलेल्या आहेत. म्हणून तर ते त्यांच्या जिवनात यशस्वी झालेत, असे माझे प्रामाणिक मत आहे. दिलीपशेठ एक आदर्श व्यक्तीमत्व आहे. आदर्श व्यक्तीच्या व्यक्तीमत्वात असणारे सद्‌गुण त्यांच्या व्यक्तीमत्वात आहे. शुध्द विचार, शुध्द आचार, निष्कलंक जीवन, त्याग आणि वेळप्रसंगी अपमान पचविण्याची ताकद हे सर्व सद्‌गुण मला त्यांच्या व्यक्तीमत्वात दिसले. म्हणून तर ते अनेक राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय पुरस्काराचे मानकरी ठरले. दिलीपशेठ यांनी समजातात अनेक माणसे जोडण्याचे काम खऱ्या अर्थाने केले. प्रामाणिकपणा, वक्तशिरपणा हा त्यांच्याकडून शिकावा. सडेतोडपणा, चांगल्यातील चांगुलपणा जाणण्याचे त्यांचे कसब अफलातून आहे. विद्‌वान सर्वत्र पुज्यते, दिलीपशेठ विद्‌वान माणसांचा सन्मान करणारे आहेत. शाब्बासकीची थाप देणारे आहेत. धाडसी आणि संवेदनशिल व्यक्तीमत्व म्हणून ते संगमनेरात सुपरिचित आहेत. १९९४ पासून संगमनेरातील अग्रगण्य समजली जाणारी जयहिंद नागरी सहकारी पतसंस्थेत त्यांनी संस्थापक ते चेअरमन म्हणून आजपर्यंत व्यवस्थितपणे धुरा सांभाळत आहेत. दबल्या पिचलेल्यांसाठी ही पतसंस्था सेवेस कटीबध्द आहे. अनेक गरजूंना रोजीरोटी हक्काचे दोन घास मिळणेकामी ह्या संस्थेने त्यांच्या नेतृत्वाखाली आजपावेतो यशस्वी मदत केली आहे. आज या संस्थेची वाटचाल यशाच्या शिखराकडे होत आहे. संस्थेचे व्यवस्थापक संदीप वाकचौरे एक विश्वासू हिरा त्यांना सापडलेला आहे. ह्या हिऱ्याने त्यांना संचालक व इतर कर्मचारी निवडणेकामी महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. राजकीय, सामाजिक, अध्यात्मीक क्षेत्रात दिलीपशेठ यांनी काम करतांना जात, धर्म या भिंती झुगारुन सर्वसामान्य जनतेसाठी अहोरात्र कष्ट घेतलेले आहे. हीच त्यांच्या प्रवासाची खरी पोहचपावती आहे. त्यांच्या सौभाग्यवती शोभाताई यांची खंबीर साथ त्याना लाभली आहे. वाघाच्या बच्छड्यांना शिकार करायची शिकवावी लागत नाही. त्याप्रमाणे त्यांची दोन्ही उजवा व डावा हात असलेली मनोज व स्वप्नील पित्याच्या पावलावर पाऊल ठेवून जनतेच्या सेवेत सक्रिय आहेत. असे हे आदर्शवत व्यक्तीमत्व आज वयाच्या ६७ व्या वर्षात पदार्पण करत आहे. त्यांना संगमनेरातील तमाम हितचिंतकांच्या वतीने मनपूर्वक शुभेच्छा!



**उत्कर्षाची शिखरे, सर तुम्ही करत रहावी**
**मागे वळूनी पहाता आमची शुभेच्छा स्मरावी**
**तुमच्या मनातील इच्छा आकांक्षांचा वेलू**
**गगनाला भिडू दे, तुमच्या जिवनात सर्व काही**
**मनासारखे घडूदे!**
**चालण्यासाठी वाट असते,**
**वाटेसाठी चालणे नसते**
**गगनभरारी मारणाऱ्याला**
**आकाशाचे भय नसते**
**आकाशाचे ओझे नसते.**

संकलक :
**श्री. बाबासाहेब नामदेव मेमाणे**
राज्य निवेदक व तज्ञ संचालक
जयहिंद नागरी पतसंस्था, संगमनेर

## निमगावजाळी लिफ्ट योजनेसाठी ४ कोटीचा निधी मंजूर : ना. विखे पाटील

**नायक वृत्तसेवा, आश्वी**

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या अंतर्गत येणाऱ्या संगमनेर तालुक्यातील निमगावजाळीची पाणी उपसा लिफ्ट योजना तसेच इतर लिफ्ट योजना अंतर्गत देखभालीसाठी गोदावरी कृष्णा खोरे कडे वर्ग करण्यात आल्या असून निमगाव जाळी पाणी उपसा लिफ्ट योजना दुरूस्त करण्यासाठी ४ कोटीचा निधीला शासनाने मंजुरी दिली असल्याची माहिती जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

शिर्डी मतदार संघातील आश्वी बुद्रुक, उंबरीबाळापुर तसेच निमगावजाळी या गावांच्या विकास कामांची आढावा बैठक नुकतीच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी कारखान्याचे संचालक विजय म्हसे, प्रवरा बँकेचे संचालक माधव गायकवाड, अजय ब्राम्हणे, संजय गांधी, शिक्षण संस्थेचे भाऊसाहेब जऱ्हाड, ॲड. रोहीणी निघुते, सोसायटीचे व्हा. चेअरमन मंच्छिद्र गायकवाड, सदस्य मच्छिंद्र ताजणे, ग्रामपंचायत सदस्य अनिल कंगणकर, मीना गायकवाड, हरीभाऊ ताजणे, अशोक जऱ्हाड, जानकीराम गायकवाड आदी उपस्थित होते.



पुढे बोलतांना विखे पाटील यांनी सांगितले की, जलसंपदाचा कार्यभार स्विकारल्या पासुन या परीसरात उजवा व डाव्या कालव्याना तसेच चाऱ्यांना मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आले. त्यामुळे भर उन्हाळ्यात ही आश्वी परिसरातील शेती हिरवीगार दिसु लागली. आगामी जिल्हा परीषद तसेच पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर विरोधात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना विखे पाटील यांनी एकाचाच 'बुक्का' लावण्याचा सल्ला दिला. ग्रामपंचायत तसेच सोसायटी निवडणुकीत विरोधात काम करणाऱ्या सखाराम तुकारामांना यापुढे संघटनेत थारा दिला जाणार नाही. आपला कार्यकर्ता हा आपलाच राहिला पाहिजे असे सांगून विरोध करणाऱ्यांना थांबण्याचा सल्ला यावेळी विखे पाटील यांनी दिला.

शिर्डी मतदार संघातील प्रत्येक गावात जलसंपदा विभागामार्फत शेतकऱ्यांच्या बांधापर्यत पाणी पोहचण्याचे काम युध्द पातळीवर सुरू आहे. आश्वी बुद्रुक तसेच उंबरी बाळापुर चारी तसेच कॉनाल वरील अतिक्रम तत्काळ काढण्याचे आदेश ही जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना यावेळी दिले.

## एसएमबीटीच्या आरोग्यसाधनेची यशस्वी दहा वर्षे!

**नायक वृत्तसेवा, नाशिक**

एसएमबीटी हॉस्पिटल आयोजित यावर्षाचे आरोग्यसाधना शिबीर नुकतेच सुरु झाले आहे. या शिबिरातील सोयीसुविधा आणि रुग्णसेवेच्या दृष्टीने आखण्यात आलेल्या योजनेचे सर्वदूर कौतुक होत असून समाजसेवेचा एक नवा आयाम यानिमित्ताने गाठण्यात यश आले आहे. गेल्या ३० दिवसांत, उत्तर महाराष्ट्रासह मराठवाड्यातील १४ जिल्ह्यांतील ३०,००० हून अधिक रुग्णांवर उपचार करण्यात हॉस्पिटलच्या टीमला यश आले आहे. ही केवळ आकड्यांची गोष्ट नसून, हजारो जीवांच्या आयुष्यातील नव्या आशेच्या किरणांचे प्रतिक असल्याचे हॉस्पिटल प्रशासनाकडून सांगण्यात आले.



आरोग्यसाधना शिबिराच्या यशस्वीतेबाबत हॉस्पिटल प्रशासनाने सांगितले की, हे शिबीर केवळ मोफत तपासणी नव्हे, तर हजारो गरजूंसाठी सशक्त उपचार, तज्ज्ञ मार्गदर्शन आणि मायेचा आधार ठरत आहे. आर्थिक दुर्बल घटकातील सर्वसामान्य रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांपर्यंत पोहोचणे शक्य नसते. शस्त्रक्रीया किंवा औषधोपचाराचा खर्च अलीकडे सर्वांच्याच आवाक्याबाहेर जात आहे. याचा गंभीर परिणाम रुग्णांवर होत असून आजही अनेक खेडोपाड्यात दुर्धर आजारांनी अनेक रुग्ण ग्रासलेले दिसून येत आहेत.

रुग्णांचा विश्वास आणि माणुसकीच्या आधारावर उभ्या राहिलेल्या एसएमबीटी हॉस्पिटलतर्फे ग्रामीण आरोग्य सुधारण्यासाठी गेल्या दहा वर्षांपासून आरोग्यसाधना शिबिराचे आयोजन केले जात आहे. गेल्या ३० दिवसांत शिबिरादरम्यान १००० हून अधिक मोठ्या शस्त्रक्रिया झाल्या आहेत. यामध्ये दोनशे पेक्षा अधिक हृदयविकार शस्त्रक्रियांचा समावेश आहे. १५०० डायालिसिस सत्रदेखील झाले आहेत. विशेष म्हणजे सवलतीत अत्याधुनिक सोनोग्राफी–एमआरआय तपासण्या, सिटी स्कॅन करण्यासाठी अनेक भागातील रुग्णांनी याठिकाणी भेटी देऊन उपचार करून घेतले.

विशेष म्हणजे या सर्व सेवा शासकीय योजनांच्या माध्यमातून मोफत उपलब्ध आहेत. यामध्ये महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत मोफत उपचार केले जात असल्याची माहिती हॉस्पिटलच्या वतीने देण्यात आली. तसेच जे आजार योजनेअंतर्गत उपचारांत बसत नाहीत अशा आजारांवर हॉस्पिटलच्या वतीने हॉस्पिटल चार्जेस, बेड चार्जेस, भूलतज्ञ चार्जेस, नर्सिंग चार्जेस, ऑपरेशन चार्जेस व जेवण पूर्णपणे मोफत दिले जात आहेत. या योजनेत रुग्णांना केवळ अत्यल्प दरातील औषधे, रेडीओलॉजी आणि पथोलॉजी चाचण्यांच्या खर्चात उपचार उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या यशस्वी शिबिरानंतर एसएमबीटी हॉस्पिटल आगामी काळात इतर तालुक्यांमध्ये उपशाखा, मोफत तपासणी केंद्रे, आणि योजनांचे जनजागरण मोहीम राबवणार आहे, जेणेकरून अधिकाधिक गरजू रुग्णांपर्यंत ही सेवा पोहोचवता येईल.

या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्राच्या १४ जिल्ह्यांमधून रुग्ण एसएमबीटीपर्यंत आले. नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, नंदुरबार, ठाणे, पालघर, बीड, परभणी, छ. संभाजीनगर, जालना, धाराशिव, वर्धा, अमरावती, नागपूर यांसारख्या भागांतून आलेल्या रुग्णांनी एसएमबीटीच्या रुग्णसेवेवर विश्वास ठेवला. एसएमबीटीने रुग्ण, वाहने, रहदारी, सुलभ सेवा, आणि स्वयंसेवकांच्या सहाय्याने प्रत्येक टप्प्यावर रुग्णांना मार्गदर्शन केले आहे.

### दररोज होतेय १००० रुग्णांची तपासणी

या वर्षीच्या आरोग्यसाधना शिबिरात योजनेत न बसणाऱ्या रुग्णांना मोफत स्पेशालिटी आणि सुपरस्पेशालिटी डॉक्टरांचे मार्गदर्शन, हॉस्पिटल चार्जेस, नर्सिंग चार्जेस, बेड चार्जेस, शस्त्रक्रिया चार्जेस, भूलतज्ञ चार्जेस आणि जेवण मोफत करण्यात आले आहेत. रुग्णांना केवळ सवलतीच्या दरात असलेली औषधे, रेडीऑलॉजी आणि पॅथोलॉजी चाचण्यांच्या खर्चात उपचार उपलब्ध करण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणात रुग्ण या योजनेच्या लाभासाठी पहिल्या दिवसापासूनच रुग्णालयात पोहोचत आहेत.

एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये एकाच छताखाली २५ वेगवेगळया विभागांच्या स्पेशालिटी आणि सुपर स्पेशालिटी सेवा देणारे ग्रामीण भागातील एसएमबीटी एकमेव हॉस्पिटल आहे. हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान, तज्ञ डॉक्टर आणि सेवाभाव यांचा संगम असल्यामुळे हृदयविकार, कर्करोग, किडनी विकार, मेंदू–मणक्याचे विकार, पोटविकार, मूत्ररोग, स्त्रीरोग कान–नाक–घसा, अस्थिरोग अशा २५ पेक्षा अधिक मल्टीस्पेशालिटीमध्ये सेवा उपलब्ध आहेत. वरील प्रत्येक विभागात तज्ञ आणि अनुभवी डॉक्टर्स पूर्णवेळ उपलब्ध आहेत.

## दादाभाऊ गुंजाळ यांचा भाजपने सन्मान केला : आ. खताळ

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

भाजपचे ज्येष्ठ नेते दादाभाऊ गुंजाळ यांनी सामान्य जनता, शेतकरी, कामगार आणि कष्टकरी वर्गासाठी सातत्याने लढा दिला. त्यांच्या या कार्याची दखल भाजपने घेऊन त्यांना राज्य परिषदेवर संधी देत त्यांचा पक्षाने खऱ्या अर्थाने सन्मान केला असल्याचे गौरवोद्गार आ. अमोल खताळ यांनी काढले.

तालुक्यातील कोल्हेवाडी येथील भाजपचे ज्येष्ठ नेते दादाभाऊ गुंजाळ यांची भारतीय जनता पार्टी राज्य परिषद सदस्यपदी निवड झाली, त्यानिमित्त कोल्हेवाडी ग्रामस्थांच्या वतीने आ. अमोल खताळ यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात आ. खताळ बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते बी. आर. वामन होते. व्यासपीठावर ज्येष्ठ विचारवंत प्रा. एस. झेड. देशमुख, ज्येष्ठ नेते वसंत गुंजाळ, वसंत देशमुख, ॲड. सदाशिव थोरात, ॲड. बापूसाहेब गुळवे, डॉ. सोमनाथ कानवडे, कोल्हेवाडीच्या सरपंच सुवर्णा दिघे, भास्कराव दिघे प्रवरा पतसंस्थेचे चेअरमन राहुल दिघे, मोहन वामन, नानासाहेब खुळे, सतीश वाळुंज, अमोल दिघे यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.



आमदार खताळ म्हणाले, दादाभाऊ गुंजाळ यांच्यामध्ये असलेली तळमळ, आत्मियता, आणि माणूसपण यातूनच त्यांचे सर्वसामान्यांच्या विषयी असलेले प्रेम दिसून येते. त्यांनी माजी उपमुख्यमंत्री स्व. गोपीनाथ मुंडे, स्व. सूर्यभान वहाडणे आणि केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्या सारख्या मोठ्या नेत्यांसोबत काम केले आहे. यावेळी प्रा. एस. झेड. देशमुख, वसंत गुंजाळ, वसंत देशमुख यांची भाषणे झाली. प्रस्ताविक राहुल दिघे यांनी केले. सूत्रसंचालन वाळुंज यांनी तर आभार मोहन वामन यांनी मानले.

दादाभाऊ आणि अमोलभाऊ ही जोडी संगमनेरच्या विकासासाठी आदर्श आहे. त्यांच्या कार्यामुळे संगमनेरमध्ये खऱ्या अर्थाने परिवर्तन घडले आहे. पूर्वी विरोधकांना कोणीच आठवत नव्हते, मात्र आ. अमोल खताळ यांच्या रूपाने परिवर्तन झाले, त्यानंतर त्यांना आता खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराज आणि आषाढी एकादशी सुद्धा आठवायला लागली असल्याची टीका प्रा. एस. झेड. देशमुख यांनी थोरात यांचा नामोल्लेख टाळून यावेळी केली.

# रुग्णसेवेसाठी डॉक्टरांचा एकत्रित प्रवास कौतुकास्पद : माजी मंत्री थोरात





**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

हॉस्पिटल सुरू करण्यासाठी आवश्यक असणारे प्रचंड भांडवल आणि किचकट नियमामुळे एकट्या डॉक्टरने आपले हॉस्पिटल उभारणे आणि चालवणे अत्यंत कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील काही डॉक्टर मित्रांनी 'कल्पतरू हॉस्पिटल' च्या माध्यमातून रुग्णसेवेसाठी एकत्रित सुरू केलेला प्रवास कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

शहरातील नवीन अकोले बायपास रोड वरील विठ्ठल मंदिरासमोर नव्याने सुरू झालेल्या १०० बेड्स, तज्ञ डॉक्टर्स आणि अत्याधुनिक सुविधाने परिपूर्ण असलेल्या कल्पतरू हॉस्पिटलच्या उद्घाटन सोहळ्यात माजी मंत्री बाळासाहेब थोरात बोलत होते. यावेळी माजी आ. डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गा तांबे, डॉ. जयश्री थोरात, दूध संघाचे अध्यक्ष रणजीत देशमुख, माजी नगराध्यक्ष विश्वास मुर्तडक, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष अजय फटांगरे, पांडुरंग घुले, हिरालाल पगडाल, प्रमिला अभंग, दिपाली वर्पे, यांच्यासह युनियन बँकेचे सुनीलकुमार यादव, अमितकुमार सिन्हा, वास्तु विशारद डॉ. महेंद्रदास वारेकर, युनियन बँकेचे चीफ मॅनेजर संदीप पवार, इंजिनीयर गोपीनाथ म्हस्के, अॅड. श्रीकृष्ण गिते, प्रा.नामदेव बोरले, प्रभाकर मेहत्रे, नौसेना अधिकारी भानुदास घनकुटे, श्रीमती सुशीला शिंदे, श्रीमती रजनी वाव्हळ आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी बाळासाहेब थोरात म्हणाले, वैद्यकीय व्यवसायात मोठ्या प्रमाणात कार्पोरेट यंत्रणांचा शिरकाव झालेला असताना रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातील सुसंवाद, विश्वास आणि मानवी भावनांची नाळ तुटत चालली आहे. अनेक ठिकाणी डॉक्टर फक्त व्यवस्थापनाच्या आदेशाने काम करणारे कर्मचारी बनले आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर शहरातील काही डॉक्टर मित्रांनी रुग्णसेवेची खरी भावना जपत एकत्र येऊन कल्पतरू हॉस्पिटलची निर्मिती केली आहे. या हॉस्पिटलमध्ये रुग्णांच्या गरजा लक्षात घेऊन आधुनिक आणि अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या हॉस्पिटलच्या माध्यमातून रुग्णसेवेचा खरा हेतू आणि डॉक्टरांच्या सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय येतो.

> ■ १०० बेड्स, तज्ञ डॉक्टर्स आणि अत्याधुनिक सुविधा असलेल्या के. एम. हॉस्पिटल मध्ये अत्याधुनिक वैद्यकीय सेवा रुग्णांना माफक दरात मिळणार आहेत. या ठिकाणी हृदयवकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मुत्र विकार, मधुमेह विकार, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालिसिस, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, गुडघा व खुबा, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, कॅथ लॅब, रेडिओलॉजी व पॅथॉलॉजी, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर, डायलिसिस या सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

संगमनेरसह शेजारील अकोले तालुक्यासह इतर अनेक तालुके आणि ग्रामीण भागातील रुग्णांना आता अत्याधुनिक वैद्यकीय सेवा मिळवण्यासाठी मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही. स्थानिक पातळीवरच विश्वासार्ह आणि परवडणाऱ्या दरात कल्पतरूत उपचार मिळणार असल्यामुळे वेळेची आणि खर्चाची ही बचत होणार आहे. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची होणारी मानसिक घालमेलही कमी होण्यास कल्पतरू कारणीभूत ठरेल असेही माजी मंत्री थोरात यावेळी म्हणाले.

माजी आमदार डॉ. सुधीर तांबे म्हणाले, आमचे तांबे हॉस्पिटल डॉ. राजेंद्र म्हस्के यांनी २५ वर्षे सांभाळले. कष्टाळू,प्रामाणिक आणि रुग्णसेवेची आवड यामुळे त्यांची वाटचाल यशस्वी झाली. मी त्यांच्या जबाबदारीवर हॉस्पिटल सोडून बाहेरगावी जायचो. रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक यांच्याशी उत्तम संवाद आणि योग्य उपचारासाठी त्यांनी घेतलेली मेहनत महत्त्वाची होती. डॉ. राजेंद्र आणि डॉ. स्वाती म्हस्के हे पती-पत्नी २४ तास रुग्णसेवेत तत्पर असायचे. आमच्या हॉस्पिटलमध्ये सेवा दिलेले डॉ. बोरले, डॉ. गीते व इतर डॉक्टरांचे कामही मी जवळून बघितले आहे. त्यांच्यासोबत इतर निष्णांत डॉक्टर आणि महेश वाव्हळ यांनी सुरू केलेले कल्पतरू मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अल्पावधीत नावलौकिकास प्राप्त ठरेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. उपस्थित पाहुण्यांचे डॉ. राजेंद्र म्हस्के, डॉ. स्वाती म्हस्के, डॉ. सुशांत गिते, डॉ. सोनाली गिते, डॉ. संदीप बोरले, डॉ. कोमल बोरले, डॉ. बाळासाहेब मेहत्रे, डॉ. सुवर्णा मेहेत्रे, डॉ. अमित शिंदे, डॉ. रूपाली शिंदे, डॉ. सखाराम घनकुटे, मीनाक्षी घनकुटे, महेश वाव्हळ, कोमल वाव्हळ आदींनी स्वागत केले.

## कवी बाबासाहेब सौदागर यांची कविता अभ्यासक्रमात

**नायक वृत्तसेवा, श्रीरामपूर**

येथील सुप्रसिद्ध चित्रपट गीतकार निसर्ग कवी बाबासाहेब सौदागर यांची कविता सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या



अभ्यासक्रमासाठी निवडली गेली आहे.पुणे विद्यापीठाच्या बी. ए. प्रथम वर्षा करीता ही सातशे महाविद्यालयातुन शिकविली जाणार आहे.

विद्यापीठ अभ्यासक्रम मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे यांनी ही माहिती दिली आहे. अभ्यासक्रम मंडळाचे सर्व संचालक आणि जेष्ठ विचारवंत समीक्षक प्रा. डॉ. सुधाकर शेलार यांनी हे पुस्तक संपादीत केले आहे. बाबासाहेब सौदागर यांनी शंभर पेक्षा जास्त चित्रपटाकरीता गीत लेखन केलेले आहे. निसर्ग कवी म्हणून ओळख असलेल्या बाबासाहेब सौदागर यांनी अनेक चित्रपटांसह लोकप्रिय मालिकेतील शिर्षक गीते लिहीली आहेत. त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले असुन या वर्षी चित्रपट पारितोषिक परीक्षण महाराष्ट्र राज्य शासनाच्या समितीवर त्यांनी काम केलेले आहे.त्यांच्या या निवडी बद्दल अहिल्यानगरच्या सांस्कृतिक क्षेत्रातुन त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## बॉम्बस्फोट निकालावर संगमनेरात जल्लोष

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाची सुनावणी तब्बल सतरा वर्षांनंतर अखेर पूर्ण झाली. विशेष एनआयए न्यायालयाने सुनावणी दरम्यान मालेगाव बॉम्बस्फोटातील सर्व हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांची निर्दोष मुक्तता केली. त्यामुळे संगमनेर शहरातील हिंदुत्ववादी संघटनांनी संगमनेर बस स्थानक परिसरात आनंद व्यक्त करत जल्लोष केला.

भाजपाच्या शहराध्यक्षा पायल आशिष ताजणे यांनी याबाबत भावना व्यक्त करतांना म्हटले की, तत्कालीन काँग्रेस सरकारने मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांना नाहक बदनाम केले मात्र आमचा न्यायदेवता व संविधानावर पुर्णपणे विश्वास होता, या तब्बल सतरा वर्षांनंतर आज न्याय मिळाल्याने आनंद व्यक्त करत आहोत.कोणताही आरोप सिद्ध झाला नाही, कोणताही पुरावा नाही म्हणून सर्वांची निर्दोष सुटका करण्यात आली आहे. न्यायव्यवस्थेनेच दाखवून दिले की आतंकवाद हा भगवा नव्हताच आणि यापुढेही नसणार असे मत ताजणे यांनी मांडले आहे.

## राज्यात आजपासून महसूल सप्ताहाचे आयोजन

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

शासनाच्या महसूल विभागामार्फत राज्यभरात 'महसूल सप्ताह २०२५' शुक्रवार दि.१ ऑगस्ट ते गुरुवार दि.७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत साजरा करण्यात येणार आहे. महसूल विभागाच्या योजनांची माहिती, लाभ व सेवा नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी शासनाने हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिली.

या संपूर्ण आठवड्यात विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, तहसीलदार, तलाठी, मंडळ अधिकारी व सर्व महसूल कर्मचारी नागरिकांपर्यंत महसूल सेवा पोहोचवण्यासाठी सज्ज राहतील. प्रत्येक जिल्ह्यात हेल्पडेस्क व व्हॉट्स अॅप सेवा सुरू करण्यात येणार असून, नागरिकांच्या शंका व अडचणींचे निरसन तत्परतेने करण्यात येईल. शासनाच्या विविध योजनांची माहिती देणारे व्हिडिओ, प्रसिद्धिपत्रके तयार करून वृत्तपत्रे, सोशल मिडिया व स्थानिक माध्यमांतून व्यापक प्रसिद्धी दिली जाणार आहे.'महसूल सप्ताह २०२५' हा उपक्रम महसूल खात्याच्या पारदर्शक, सक्षम व लोकाभिमुख कार्यपद्धतीचा भाग असून, शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचा शासनाचा प्रयत्न या उपक्रमातून प्रत्यक्षात उतरणार आहे.


**पाहिजेत** नामांकित कन्स्ट्रक्शन कंपनीसाठी अनुभवी कर्मचारी पाहिजे.

| पदाचे नाव | पद संख्या |
|---|---|
| सिव्हिल इंजिनियर (दोन वर्षाचा अनुभव) | 3 |
| साईट सुपरवायझर (दोन वर्षाचा अनुभव) | 4 |
| अकाउंटंट (वाणिज्य शाखा पदवीधर,दोन वर्षाचा अनुभव) | 2 |
| डाटा एन्ट्री ऑपरेटर (अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर) | 2 |


7083429096/7710771055
टॉप टेन इम्पिरियर, पहिला मजला, शॉप नंबर 27 रिलायन्स, डिजिटलच्या वर, पुणे नाशिक रोड, संगमनेर -422605

जाहिरात छोटी.....
प्रतिसाद मोठा.

छोट्या जाहिरातीचे दर
रु.300/-
3+1 (4) दिवस
शब्द मर्यादा 40 फक्त

सेल्समन पाहिजेत
जेन्ट्स सेल्समन - 2 जागा
लेडीज सेल्समन - 3 जागा
कॉम्प्युटर ऑपरेटर- 2 जागा
सारिका ड्रेसेस
बाजारपेठ, संगमनेर
9822358335

जाहिरातीसाठी संपर्क-सचिन
9767007746


### पान १ वरुन

**'सुरत-चेन्नई' महामार्ग जिल्ह्यासाठी 'गेमचेंजर'!**

मिळाली आहे.

सुमारे ५० हजार कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पाचे दोन भाग असून पहिल्या भागात सुरत ते सोलापूर हा ५६४ किलोमीटरचा व सोलापूर ते चेन्नई हा ७०७ किलोमीटर अंतराचा दुसरा टप्पा आहे. यातील चेन्नई ते सोलापूर (अक्कलकोट) पर्यंतच्या रस्त्याचे काम पूर्ण झाले असून आता सोलापूर ते नाशिक (आडगाव) पर्यंतच्या रस्त्याचे प्रत्यक्ष बांधकाम आणि आडगाव ते आंबेगाव (जि.नाशिक) पर्यंतच्या अंतराचे भूसंपादन होणार आहे. अर्थ मंत्रालयाच्या मंजुरीनंतर आता या प्रकल्पाला केंद्रीय मंत्रीमंडळाच्या मंजुरीची प्रतिक्षा असून येत्या पंधरवड्यातच हा विषय मार्गी लागणार असल्याचे राज्य शासनातील सूत्रांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे येत्या महिनाभरातच बहुचर्चीत, सुरुवातीला शेतकऱ्यांचा प्रचंड विरोध झालेल्या या एक्सप्रेस महामार्गाचे काम प्रत्यक्षात सुरु होणार आहे.

गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगाणा आणि तामीळनाडू अशा पाच राज्यातून जाणाऱ्या या महामार्गाला तिरुपती, कडप्पा, कर्नुल, कलबुर्गी, सोलापूर व सुरत ही शहरे एकमेकांना थेट जोडली जाणार आहेत. सुरत ते चेन्नई या दोन टोकाच्या शहरांमधील आजचे रस्ते अंतर १६०० किलोमीटर असून प्रवासाचा कालावधी ३५ तासांहून अधिक आहे. मात्र नव्या महामार्गामुळे जवळपास तिनशे किलोमीटर अंतर कमी होवून प्रवासाचा कालावधीही निम्म्याने कमी होणार आहे. सुरत ते सोलापूर या ५६४ किलोमीटर अंतरासाठी ३० हजार कोटी रुपये खर्च होण्याची अपेक्षा असून सोलापूर ते चेन्नई या ७०७ किलोमीटर अंतरासाठी १५ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. सध्या चेन्नई ते अक्कलकोट (सोलापूर) पर्यंतचा महामार्ग तयार झाला आहे.

महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, बीड, धाराशिव व सोलापूर या पाच जिल्ह्यातून जाणाऱ्या सुरत-चेन्नई या ग्रीनफिल्ड महामार्गाची रुंदी ७० मीटर असणार आहे, त्यासाठी १०० मीटर रुंद जमीनीचे अधिग्रहण होणार आहे. नाशिक जिल्ह्यातून १२२ किलोमीटर तर, अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर, राहाता, राहुरी व अहिल्यानगर तालुक्यातील ४९ गावांमधून ९८.५ किलोमीटर अंतरकापून हा महामार्ग पुढे बीड जिल्ह्यात जाणार आहे. संगमनेर तालुक्यातील चिंचोली गुरव, तळेगाव, वडझरी, कासारे, लोहारे, गोगलगाव, सादतपूर, हसनापूर अशा अठरा गांवामधून तो सोनगावमधून राहुरी तालुक्यात प्रवेश करेल. त्यासाठी जिल्ह्यातील एकूण एक हजार हेक्टर तर, संगमनेर तालुक्यातील २८२ हेक्टर जमीनीचे संपादन होणार आहे. वांबोरी घाटातून हा महामार्ग ३० ते ४० मीटर उंचीच्या पिलर्सवरुन जाणार असल्याचे सांगण्यात आले.

कोणत्याही देशाची सक्षम दळणवळण व्यवस्था त्या देशाच्या विकासाचे मूळ असते. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जल, वायू आणि जमीनीवर रस्त्यांचे जाळे विणण्याची योजना आखली असून भारतमाला योजनेतंर्गत सुरत ते चेन्नई हा 'मुंबई-पुणे' एक्सप्रेस महामार्गानंतरचा देशातील सर्वात मोठ्या लांबीचा महामार्ग पूर्ण करुन लवकरात लवकर तो जनतेसाठी खुला करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. सिन्नरजवळील वावीत हा महामार्ग समृद्धीला तर, नाशिकमध्ये मुंबई-आग्रा महामार्गाला जोडला जाणार आहे. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातून उत्तर व दक्षिण भारतात जाण्यासाठी वेगवान महामार्ग उभे राहणार असल्याने चेन्नई-सुरत हा भारतमालेतील महत्वपूर्ण प्रकल्प अहिल्यानगर जिल्ह्यासाठी गेमचेंजर ठरणार आहे.







'बांधिलकी जनहिताची नायक' हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग अॅण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टँडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

पाहिजेत

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४



बांधिलकी जनहिताची
# नायक
MAHMAR/2018/75654



जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल अँण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन
सर्जरी
लेझर सेंटर
स्त्रीरोग-प्रसुति
मुळव्याध-भगंदर-फिशर









# शांत संगमनेर अशांत करण्याचा प्रयत्न!

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

सध्या संगमनेरात विविध पक्षांचे फ्लेक्स लावण्याची जणू स्पर्धाच लागली आहे. त्यातून अलीकडच्या काही दिवसात शुभेच्छा फ्लेक्सच्या विटंबनेच्या घटना समोर आल्याने राजकीय पक्षांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यात एकमेकाविषयी रोष आणि धुसफुस पाहायला मिळत आहे. त्यातून शांत संगमनेर, अशांत करण्याचा काही विकृत प्रवृत्तींचा प्रयत्न असल्याचे घडलेल्या घटनांवरून समोर येत आहे. त्यामुळे शहराचे विद्रूपीकरण आणि शांततेला बाधा पोहोचवणाऱ्या सर्वपक्षीय फ्लेक्स वर शहर आणि तालुक्यात बंदी घालावी अशी मागणी सुजाण नागरिकांनी केली आहे.

श्रावण महिन्याच्या प्रारंभी महायुती आणि महाविकास आघाडीच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आपापल्या पक्षाच्या नेत्यांचे फोटो छापून शिवभक्तांना शुभेच्छा देणारे फ्लेक्स शहरात आणि तालुक्यातील गावागावात लावले आहेत. त्यातून खांडगाव येथे आ. अमोल खताळ, अकोले नाका येथे माजी खासदार डॉ. सुजय विखे, तालुक्यातील वडगाव पान येथे आणि शहरातील स्वामी समर्थ मंदिराजवळ माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या शुभेच्छा फ्लेक्सची अज्ञात व्यक्तींनी विटंबना केल्याच्या घटना लागोपाठ समोर आल्या आहेत. त्यामुळे त्या त्या नेत्यांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष पहायला मिळत आहे. यातून काही अनुचित प्रकार घडण्याआधी शहर आणि तालुक्यात फ्लेक्स बंदीची गरज असल्याचे नागरिकांनी म्हटले आहे.

## फ्लेक्सच्या स्पर्धेत शहराचे विद्रूपीकरण

संगमनेर शहर आणि तालुक्यात सध्या फ्लेक्स बाजीला उत आला आहे. शहरातील बसस्थानक परिसर या शहर फ्लेक्सचा हॉटस्पॉट बनला आहे. बसस्थानक परिसरात या फ्लेक्समुळे एसटी बस चालकांना बस वळवतांना दिसत नाही. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता ही नाकारता येत नाही. मोठमोठे आणि एकमेकाला खेटून फ्लेक्स लावले जात असल्याने शहराचे व बस स्थानक परिसराचे सौंदर्य या फ्लेक्सच्या गर्दीत हरवले आहे.



























कुटे हॉस्पिटल अँण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर • एसी/डिलक्स रुम्स् • महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध • तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ • डायलेसिस विभाग • इन्टरकॉम, टीव्ही • ९ बेडस्चा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग • नर्स कॉल बेल सिस्टिम • गरम पाण्यासाठी सोलर • सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन • सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया • सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध • अत्याधुनिक सुविधा • ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५